**Place: Mumbai** **Sd/-**
**Date :15 /06/2023** **Secretary**

## PUBLIC NOTICE

Notice is hereby given on behalf of **Mr. Prasad R. Rao and Mrs. Charlotte Rao**, to the public at large that Original Document viz., Agreement For Sale dated 28th August 1979, between **M/s. Evershine Builders Pvt. Ltd. and Mr. P. Shankaran Sukumaran,** in respect of Flat No. A/4, admeasuring 450 Sq. ft. Built up area on the 1st Floor in the building known as **"Nilkanth Co-opt. Housing Society Ltd"** situated at Ramchandra Lane Extension, Evershine Nagar, Malad (West), Mumbai- 400 064, is lost/misplaced. The said Document/ Agreement is essential and necessary link in the said chain of title for the aforesaid Flat. They now intend to sell the above mentioned Flat therefore this notice has been advertised for General Public. Any person(s) having any claim, right, title and/or interest or demand(s) in or against the said property or against the said owner by way of sale, mortgage, charge, trust, lien, possession, gift, maintenance, inheritance, lease, attachment or otherwise howsoever is hereby required to make the same known in writing together with supporting documents to the undersigned at their office at 37/38, 3rd Floor, Landmark Tower, Link Road, Mithchowki, Malad (West), Mumbai- 400 064, within a period of 14 days (both days inclusive) of the publication hereof failing which the claim of such person(s) will be deemed to have been waived and/or abandoned.

**Date: 16.06.2023** **sd/-**
**Place: Mumbai** **Nishant Rana**
**Advocate High Court**

Form No. 1-A Pro.No. 9898 Dt. 15/06/2023

**Summons/Notice for Service by advertisement in a News Paper (Order V. Rule 20)**

## IN THE COURT OF 14th CIVIL JUDGE SR. DN. NAGPUR

R.C.S. No. 530/2023 Room No. 205
F.F. 26/06/2023

**Plaintiff :** Anthoni Titus
VERSUS
**Defendants :** Sonia Innocent John & Oth.

To,
**1) Sonia Innocent John** R/o. Plot No. 100, 101, Sant Martin Nagar, Near Juliee Kirana Stores, Jaripatka, Nagpur - 440014 **2) Mona Samuel**, R/o. Plot No. 100, 101, Sant Martin Nagar, Near Juliee Kirana Stores, Jaripatka, Nagpur - 440014

Whereas Plaintiff has instituted a Suit for Declaration, Mandatory and Permanent Injunction and An Application Under Order 39 Rule 1 and 2 Read with Section 151 of CPC for grant of temporary Injunction against you. You are Hereby Summoned/Noticed to the appear in this court in Person or by a pleader on the 26th Day of Jun, 2023 at 11.00 O' Clock, to the same, failing the suit/application will be disposed of ex-parte.

Given under my hand and the seal of the Court this 16th day of June 2023

Seal **By order of the Asst. Superintendent, Civil Judge Senior Division, Nagpur**

Companies,
Insight Out



Companies, Monday to Saturday

To book your copy, sms reachbs to 57575 or email order@bsmail.in

Business Standard
Insight Out

मुंबईतील इंधन दर: पेट्रोल 106.31 | डिझेल 94.27

BSE 62.917.63 - 310.88 | NSE 18.688.10 - 67.80

USD 1$ ₹81.91 | EURO 1€ ₹89.63 | POUND 1£ : ₹104.63

सराफ बाजार: सोने : ₹59,670 (२४कॅरट, प्रति १० ग्रॅम) | चांदी : ₹73,100 (प्रति १ किलो)

अंडी : 570 (एनईसीसी) गुरुवारसाठी (प्रति १०० नग)

# शेअर बाजारात मोठी घसरण

## व्याजदरवाढीच्या भीतीने गुंतवणूकदारांचा विक्रीवर भर

मुंबई, ता. १५ : अमेरिकी फेडरल बँकेच्या यावर्षी दोनदा व्याजदरवाढ करण्याच्या वक्तव्याने धास्तावलेल्या गुंतवणूकदारांनी विक्रीवर भर दिल्याने आज भारतीय शेअर बाजारात मोठी घसरण झाली आणि गेल्या तीन दिवसांतील तेजी संपुष्टात आली. सेन्सेक्स ३१०.८८ अंश, तर निफ्टी ६७.८० अंश घसरला. या घसरणीमुळे आज सेन्सेक्स पुन्हा ६३ हजारांच्या खाली गेला.

अमेरिकी फेडरल बँकेने आज व्याजदरवाढ केली नसली तरीही या वर्षात दोनदा व्याजदरवाढ करण्याचे आक्रमक विधान फेडतर्फे करण्यात आल्याने गुंतवणूकदार चांगलेच धास्तावले. त्यामुळे आज सकाळी काही काळ नफ्यात असलेले निर्देशांक नंतर घसरले. दिवसअखेर सेन्सेक्स ६२,९१७.६३ अंशांवर, तर निफ्टी १८,६८८.१० अंशांवर स्थिरावला. आज आरोग्य, एफएमसीजी क्षेत्राचे शेअर नफा दाखवत होते, तर बँकांच्या शेअरमध्ये विक्री झाली.

अमेरिकेतील चलनवाढ फेडरल बँकेच्या निर्धारित लक्ष्यापेक्षा जास्त होण्याची शक्यता असल्यामुळे फेडरल बँकेतर्फे आक्रमक विधान करण्यात आले. त्यामुळे आज भारतीय शेअर बाजारात बड्या शेअरमध्ये सपाटून विक्री झाली. त्यातच आता युरोपीय मध्यवर्ती बँक आणि अन्य मध्यवर्ती बँकाही आपले व्याजदराचे धोरण ठरवणार असल्यामुळे बाजारात मोठे चढ-उतार होत राहतील, अशी शक्यताही तज्ज्ञांनी व्यक्त केली.

### ‘बीएसई’चे बाजारमूल्य उच्चांकावर

मुंबई शेअर बाजारातील सर्व गुंतवणूकदारांच्या एकूण सर्व शेअरचे भांडवली बाजारमूल्य आज सर्वकालिक उच्चांकी स्तरावर गेले. आज हे मूल्य २९१.८९ लाख कोटी रुपये एवढे झाले. २८ मार्चपासून हे मूल्य १६ टक्के वाढले असून, त्यानंतर ते चार टक्के वाढले आहे. यापूर्वी गेल्या वर्षी १४ डिसेंबर रोजी हे बाजारमूल्य २९१.३० लाख कोटी रुपये एवढे होते.

अमेरिकी फेडरल बँकेने आज दरवाढ केली नसली, तरी या वर्षात दोनदा दरवाढ करण्याच्या त्यांच्या आक्रमक विधानांमुळे सगळे शेअर बाजार धास्तावले आहेत. भारतीय शेअर बाजार आज तोटा दाखवीत असले, तरी निफ्टी मिडकॅप इंडेक्स सर्वकालिक उच्चांकी स्तरावर आहे.
- विनोद नायर, जिओजित फायनान्शिअल सर्व्हिसेस

### रुपयात १४ पैसे घसरण

भारतीय शेअर बाजारात आज घसरण झाल्यामुळे, तसेच अमेरिकेत आज व्याजदरवाढ झाली नसल्यामुळे डॉलरचे मूल्य वाढून भारतीय रुपया अमेरिकी डॉलरच्या तुलनेत १४ पैसे घसरून ८२.१९ वर स्थिरावला. परदेशी भांडवली गुंतवणूकदारांनी भारतात निधी आणणे; तसेच कच्च्या तेलाचे भाव घसरणे यामुळे रुपयाला तळाच्या भावात चांगला आधार मिळाला. आज रुपया ८२.१६ वर खुला झाला. त्याने आज ८२.०२ चा उच्चांक, तर ८२.२५ चा निचांक नोंदवला. बुधवारी रुपया ८२.०५ वर बंद झाला होता.

## दृष्टिक्षेपात

### ‘केंट ग्रँड स्टार’ अंतर्गत ब्लॅक एडिशन सादर



पुणे : वॉटर प्युरिफायर बाजारपेठेतील आघाडीच्या केंट आरओ सिस्टिम्स लिमिटेडने ‘केंट ग्रँड स्टार’ अंतर्गत ब्लॅक एडिशन सादर केली आहे. ‘केंट ग्रँड स्टार’ आरओ वॉटर प्यूरीफायरमधून पिण्याचे पाणी १०० टक्के शुद्ध होते. त्यासाठी आधुनिक तंत्रज्ञानाचा समावेश केला आहे. ब्लॅक एडिशन स्टाईलीश असून स्वयंपाक घरात शोभून दिसेल, अशा पद्धतीने तिची रचना केली आहे. त्यात अत्याधुनिक मल्टी-स्टेज फिल्ट्रेशन असून त्यामुळे पाणी शुद्ध होते. त्यात अत्याधुनिक स्मार्ट डिजिटल डिस्प्ले असून वॉटर फ्लो रेट, फिल्टरचे आयुर्मान आणि फिल्टर बदलण्याची वेळ आली की त्याची माहिती डिस्प्लेवर मिळते. ब्लॅक एडिशनलाही देखभाल-दुरुस्तीची आवश्यकता भासत नाही. यामध्ये तासाला १० लिटर पाणी शुद्ध होते. त्यामुळे घरात तसेच ऑफिसेसमध्येही तो उपयुक्त आहे. त्यातील झिरो वेस्टेज तंत्रज्ञानामुळे पाणी वाया जाण्याचे प्रमाण कमी झाले आहे. याचा आकारही लहान आहे. केंट आरओचे अध्यक्ष डॉ. महेश गुप्ता म्हणाले, “केंट ग्रँड स्टार-बी, हे उत्पादन ग्राहकांना पिण्याचे शुद्ध पाणी पुरविण्याच्या आमच्या मोहिमेतील एका महत्त्वाचा टप्पा आहे. त्यात आधुनिक तंत्रज्ञानाचा समावेश केला आहे. त्यामुळे वॉटर प्युरिफिकेशन क्षेत्रात क्रांती झाली आहे.”

# व्यापारी तूट मे महिन्यात २२.१२ अब्ज डॉलरवर

## पाच महिन्यांतील उच्चांकी पातळी



नवी दिल्ली, ता. १५ : देशाची व्यापारी तूट मे २०२३ मध्ये पाच महिन्यांच्या उच्चांकावर पोहोचली आहे. एप्रिलच्या तुलनेत व्यापारी मालाची निर्यात १०.३ टक्क्यांनी घसरून ३४.९८ अब्ज डॉलर झाली, तर आयात ६.६ टक्क्यांनी घटून ५७.१ अब्ज डॉलरवर गेली आहे. त्यामुळे मे महिन्यात २२.१२ अब्ज डॉलरची व्यापारी तूट नोंदवली गेली आहे.

गेल्या वर्षी मे महिन्यात २४.२९ अब्ज डॉलरची व्यापारी तूट नोंदवली होती. वाणिज्य मंत्रालयाने आज ही आकडेवारी जारी केली. मे महिन्यात सेवा क्षेत्राची निर्यात २५.३० अब्ज डॉलर, तर आयात १३.५३ अब्ज डॉलर होती. एप्रिल-मे या कालावधीत, व्यापारी आणि सेवा व्यापार तूट १३.२८ अब्ज डॉलर होती. मागील वर्षी याच कालावधीत ती २०.५६ अब्ज डॉलर होती.देशाची व्यापारी तूट मे २०२३ मध्ये पाच महिन्यांच्या उच्चांकावर पोहोचली आहे.

“अनेक विकसित देशांमध्ये मंदी आहे आणि त्यांच्या जीडीपी वाढीचा दरही घसरला आहे, परिणामी त्यांची आयात मागणी खूपच कमी आहे,” असे व्यापार सचिव सुनील बर्थवाल म्हणाले. वाणिज्य विभाग आणि उद्योग आणि अंतर्गत व्यापार प्रोत्साहन विभाग निर्यात धोरणावर काम करत आहे. त्यात ४० देशांवर लक्ष केंद्रित करण्यात आले आहे, असेही -त्यांनी सांगितले.

# पितांबरी अगरबत्तीचे लोकार्पण

पुणे, ता. १५ : पितांबरीने नव्यानेच उपलब्ध केलेल्या ‘देवभक्ती राहू दोष निवारण अगरबत्ती’ व देवभक्ती ‘शनी उपासना साडेसाती स्पेशल अगरबत्ती’चे मान्यवरांच्या हस्ते नुकतेच लोकार्पण करण्यात आले.

ज्योतिष संशोधन केंद्र-जळगाव, अभिजित प्रतिष्ठान मुंबई, द लीला टॅरो-पुणे यांच्यातर्फे व पितांबरी प्रॉडक्ट्स प्रायोजित तिसरे अखिल भारतीय ज्योतिष अधिवेशन नुकतेच येथे झाले. याचे उदघाटन पितांबरी प्रॉडक्ट्सचे व्यवस्थापकीय संचालक रवींद्र प्रभुदेसाई यांच्या हस्ते झाले. ज्योतिष क्षेत्रातील राज्यातील ३१ संस्था तसेच ३०० हून अधिक ज्योतिषतज्ज्ञ, ज्योतिष अभ्यासकांनी या अधिवेशनात भाग घेतला.

प्रभुदेसाई म्हणाले, राहू व शनी या दोन ग्रहांमुळे निर्माण होणारे दोष नाहीसे करणाऱ्या उदबत्त्या उपलब्ध नाहीत. ही गरज ओळखून पितांबरीने शास्त्रोक्त पद्धतीने निर्मिती केलेल्या ‘देवभक्ती राहू दोष निवारण अगरबत्ती’ व देवभक्ती ‘शनी उपासना साडेसाती स्पेशल अगरबत्ती’ ग्राहकांसाठी उपलब्ध केल्या आहेत. राहुला प्रिय असलेल्या कस्तुरी गंधाने युक्त आणि दुर्वाची पावडर वापरून पितांबरीच्या देवभक्ती राहू दोष निवारण अगरबत्तीची निर्मिती केली आहे. तसेच, शनीला प्रिय असलेल्या नागकेसर फुलाचा सुगंध आणि शमी वृक्षाच्या लाकडाची पावडर वापरून शनी उपासना साडेसाती स्पेशल अगरबत्ती तयार केली आहे.”




पुणे : अखिल भारतीय ज्योतिष अधिवेशनात रवींद्र प्रभुदेसाई, गोविंद कुलकर्णी आणि ज्योती जोशी यांच्या उपस्थितीत ‘देवभक्ती राहु दोष निवारण अगरबत्ती’ व देवभक्ती ‘शनी उपासना साडेसाती स्पेशल अगरबत्ती’चे लोकार्पण करण्यात आले.

# कोटक बँकेची नवी ‘ॲक्टिव्ह मनी’ योजना

## खातेदारांना मिळणार दुहेरी फायदा

मुंबई, ता. १५ : बचत आणि चालू खात्याच्या खातेदारांना आपल्या पैशांवर एफडीचे सात टक्केचे व्याज मिळण्याची आणि दंड न भरता केव्हाही पैसे काढण्याची सुविधा असलेली ॲक्टिव्ह मनी योजना कोटक बँकेने आणली आहे. यामुळे या खातेदारांना बचत खाते आणि एफडी या दोघांचेही फायदे मिळतील व तोटा काहीही सहन करवा लागणार नाही, असा बँकेचा दावा आहे. बँकेच्या ग्राहक बँकिंग विभागाचे अध्यक्ष विराट दिवाणजी यांनी आज येथे ही माहिती दिली.

अनेक खातेदार तातडीच्या गरजांसाठी पैसे लागले म्हणून बचत खात्यात मोठ्या रकमा ठेवतात. त्यावर व्याजही कमी मिळते. आता कोटकच्या खात्यात किमान रकमेपेक्षा जास्त रक्कम आली की, ती जादा रक्कम आपोआप एफडीमध्ये वर्ग होऊन त्यावर सात टक्के व्याज मिळेल. सहा महिन्यांसाठी हे व्याज असेल. त्यानंतर आपोआप दर सहा महिन्यांनी त्या एफडीचे नूतनीकरण होईल.

### कोणताही दंड नाही

खातेदारांना गरज लागल्यास ते केव्हाही यातील रक्कम काढून घेऊ शकतील. तेवढ्या रकमेवर त्यांना व्याज मिळणार नाही. सोबतच एफडीमध्येच तोडल्याचा दंडही भरावा लागणार नाही. पुन्हा किमान रकमेपेक्षा जादा रक्कम खात्यात आल्यास ती एफडीमध्ये वर्ग होईल, अशी ही योजना असल्याचे कोटक बँकेचे चीफ मार्केटिंग ऑफिसर रोहित भसीन यांनी सांगितले.

### इनफिनिक्सचा नोट ३० फाईव्ह जी बाजारात

मुंबई, ता. १५ : इनफिनिक्स स्मार्टफोन ब्रँडचा ‘फाईव्ह जी’मधील सर्वोत्तम असा पण सर्वसामान्यांना परवडणारा नोट ३० फाईव्ह जी हा स्मार्टफोन बाजारात आला आहे. याची किंमत फक्त १४ ते १५ हजार रुपये आहे.

इनफिनिक्सच्या यापूर्वीच्या ‘नोट-१२’ या फाईव्ह जी फोनलाही चांगला प्रतिसाद मिळाला होता. त्यानंतर आता हा दुसरा फोन बाजारात येत आहे. हा फोन फ्लिपकार्टवर सध्या मिळू शकेल, त्यानंतर तो पश्चिम भारतातदेखील दुकानात मिळू शकेल, असे इन्फिनिक्स इंडियाचे सीईओ अनिश कपूर यांनी सांगितले. या फोनमध्ये हाय रेझोल्युशन कॅमेरा, त्वरित आणि सुरक्षित चार्जिंगची व्यवस्था असून त्याच्यात फाईव्ह जी चे १४ बँड आणि २५६ जीबीपर्यंत मेमरी असल्यामुळे वापरकर्त्यांना अत्यंत चांगला अनुभव मिळेल, असेही कपूर म्हणाले.

# विमान प्रवाशांच्या संख्येत १५ टक्के वाढ

नवी दिल्ली, ता. १५ : देशांतर्गत विमान प्रवाशांची संख्या मे महिन्यात एक कोटी ३२ लाखांवर गेली असून, गेल्या वर्षीच्या याच कालावधीच्या तुलनेत त्यात १५ टक्के वाढ झाल्याचे नागरी विमान वाहतूक महासंचालनालयाच्या (डीजीसीए) आज जारी झालेल्या आकडेवारीवरून स्पष्ट झाले आहे.

ही संख्या मे २०२२ मध्ये एक कोटी १४ लाख ६७ हजार होती. जानेवारी ते मे २०२३ या कालावधीत विमान प्रवाशांची एकूण संख्या सहा कोटी ३६ लाख होती, तर गेल्या वर्षीच्या याच कालवधीत ती चार कोटी ६७ लाख ३७ हजार होती.

परवडणाऱ्या दरात विमानसेवा देणारी देशातील आघाडीची विमानसेवा कंपनी इंडिगोने ८१ लाख १० हजार प्रवाशांची वाहतूक केली आहे. त्यामुळे तिचा बाजारहिस्सा एप्रिल महिन्यातील ५७.५ टक्क्यांवरून ६१.४ टक्क्यांपर्यंत वाढला आहे. टाटा समूहाच्या तीनही विमानकंपन्या एअर इंडिया, एअरएशिया इंडिया आणि विस्तारा यांचा मे महिन्यातील बाजार हिस्सा अनुक्रमे ९.४ टक्के, ७.९ टक्के आणि ९ टक्के वाढताना दिसला. मे महिन्यात एअर इंडिया आणि विस्ताराने अनुक्रमे १२.४४ लाख आणि ११.९५ लाख प्रवाशांची वाहतूक केली.

पान १ वरून

# चक्रीवादळ धडकले!

## ‘बिपरजॉय’चा परिणाम

- किनारपट्टीवरील जिल्ह्यांमध्ये ऑरेंज आणि रेड अलर्ट
- किनारपट्टीपासून १० किमीच्या अंतरावरील वीस गावांमधील लोक सुरक्षितस्थळी
- वादळी वाऱ्यांमुळे २४० गावांमधील वीजपुरवठा खंडित
- सखल भागांमध्ये पुराचा धोका, अनेक वृक्ष उन्मळून पडले

संध्याकाळी धडकण्यास सुरुवात झाली. यावेळी वादळ जखाऊ बंदरापासून ७० किलोमीटर दूर समुद्रात होते. समुद्रातून वादळ पूर्णपणे जमिनीवर सरकण्यास किमान चार तास लागतील, असा अंदाज भारतीय हवामानशास्त्र विभागाचे महासंचालक डॉ. मृत्युंजय मोहपात्रा यांनी वर्तवला. हे श्रेणी-३ मधील वादळ आहे. चक्रीवादळाच्या डोळ्याची, म्हणजेच केंद्रबिंदूची रुंदी ५० किलोमीटर आहे. हे चक्रीवादळ जमिनीच्या दिशेने सरकताना वाऱ्याचा वेग वाढत जाईल, असे डॉ. मोहपात्रा यांनी सांगितले. कच्छ, देवभूमी द्वारका, जामनगर, पोरबंदर, राजकोट, मोरबी आणि जुनागड या जिल्ह्यांमध्ये मुसळधार ते अतिमुसळधार पाऊस कोसळण्याचा अंदाज हवामान विभागाने व्यक्त केला आहे. याशिवाय, पिके, घरे, रस्ते, विजेचे खांब यांचेही नुकसान होण्याचा इशारा देण्यात आला आहे.

वादळाची पूर्वकल्पना असल्याने गुजरात सरकारने सुमारे एक लाखांहून अधिक जणांना सुरक्षितस्थळी आधीच हलविले होते. यामुळे कोणतीही जीवित हानी न झाल्याची आशा प्रशासनाने व्यक्त केली आहे. वादळाच्या प्रभावामुळे आज सकाळपासूनच मुंबई आणि गुजरातच्या किनारपट्टीवर उंच लाटा उसळत होत्या. सुरक्षेचा उपाय म्हणून मुंबईतही समुद्रकिनारी जाण्यास नागरिकांना मनाई करण्यात आली होती.

### ‘गेल’च्या संचालकपदी संजय कुमार

नवी दिल्ली, ता. १५ : गॅस अथॉरिटी ऑफ इंडियाच्या (गेल) संचालकपदी (मार्केटिंग) संजय कुमार यांची नियुक्ती झाली आहे. यापूर्वी संजय कुमार हे दिल्ली परिसराला गॅस पुरवठा करणाऱ्या इंद्रप्रस्थ गॅस कंपनीचे व्यवस्थापकीय संचालक होते. संजय कुमार हे आयआयटी खरगपूरचे मेकॅनिकल इंजिनियर आणि एमबीए असून त्यांना नैसर्गिक वायू क्षेत्रातील ३५ वर्षांचा अनुभव आहे. १९८८ मध्ये ते गेलमध्ये रुजू झाल्यानंतर त्यांनी नैसर्गिक वायूचे मार्केटिंग, नैसर्गिक वायूचा व्यापार, जहाज वाहतूक, वायू मिळवणे, गॅसचे वहन, गॅस वाहिन्यांचे संचालन आणि देखभाल आदी कामे बघितली आहेत.


ORACLE

**ओरॅकल फायनान्शिअल सर्व्हिसेस सॉफ्टवेअर लिमिटेड**

नोंदणीकृत कार्यालय: ओरॅकल पार्क, पश्चिम द्रुतगती महामार्गाजवळ, गोरेगाव (पूर्व), मुंबई - ४०० ०६३
दूरध्वनी: +९१ २२ ६७१८ ३००० फॅक्स: +९१ २२ ६७१८ ३००१ सीआयएन: एल७२२००एमएच१९८९पीएलसी०५३६६६
वेबसाइट: https://investor.ofss.oracle.com ई-मेल: investors-vp-ofss_in_grp@oracle.com

**सभासदांना ३४ व्या वार्षिक सर्वसाधारण सभेची सूचना**

याद्वारे सूचना देण्यात येते की कंपनीची ३४ वी वार्षिक सर्वसाधारण सभा (‘एजीएम’) ही, सूचनेमध्ये नमूद करण्यात आलेले कामकाज पार पाडण्यासाठी, सर्वसामान्य स्थळी सभासदांच्या वास्तविक उपस्थितीशिवाय, कंपनी अधिनियम, २०१३ च्या लागू तरतुदी आणि त्याअंतर्गत तयार करण्यात आलेले नियम आणि सेबी (लिस्टिंग ऑब्लीगेशन्स अँण्ड डिस्क्लोजर रिकायरमेंट्स) रेग्युलेशन्स, २०१५ आणि मिनिस्ट्री ऑफ कॉरपोरेट अफिर्यसद्वारे (‘एमसीए’) जारी करण्यात आलेली २८ डिसेंबर, २०२२, तारखेची सर्वसाधारण परिपत्रक क्र.१०/२०२२ आणि सिक्युरिटीज अँड एक्स्चेंज बोर्ड ऑफ इंडिया (‘सेबी’) यांच्याद्वारे जारी केलेले ५ जानेवारी, २०२३ चे परिपत्रक क्र. SEBI/HO/CFD/PoD-2/P/CIR/2023/4 (येथे यानंतर एकत्रितपणे “परिपत्रके” म्हणून संबोधण्यात येते) यांच्या अनुपालनासह, गुरूवार, २७ जुलै, २०२३ रोजी संध्याकाळी ५:०० वाजता आयएसटीला व्हिडिओ कॉन्फरन्स (‘व्हीसी’)/इतर ऑडिओ व्हिडिओ व्हिज्युअल प्रकारांद्वारे (‘ओएव्हीएम’) घेण्यात येईल.

वरील परिपत्रकांच्या अनुपालनासह, कंपनीकडे आणि/किंवा डिपॉझिटरी पार्टिसिपन्टकडे (पार्टिसिपन्ट्सकडे) ज्या सभासदांचे ईमेल ॲड्रेस नोंदणीकृत आहेत, अशा सभासदांना एजीएम सूचनेच्या इलेक्ट्रॉनिक प्रती आणि वित्तीय वर्ष २०२२-२३ साठीचा वार्षिक अहवाल पाठवण्यात येतील.

एजीएमची सूचना आणि २०२२-२३ चा वार्षिक अहवाल कंपनी (https://investor.ofss.oracle.com), बीएसई लिमिटेड (www.bseindia.com), नॅशनल स्टॉक एक्स्चेंज ऑफ इंडिया लिमिटेड (www.nseindia.com) आणि नॅशनल सिक्युरिटीज डिपॉझिटरी लिमिटेडच्या (https://www.evoting.nsdl.com) या वेबसाइटवर उपलब्ध करण्यात येईल.

सभासद हे केवळ व्हीसीद्वारे/ओएव्हीएम सुविधेद्वारे सामील आणि सहभागी होऊ शकतील. एजीएममध्ये सामील होण्याचे निर्देश एजीएमच्या सूचनेमध्ये नमूद करण्यात येतील. कंपनी अधिनियम, २०१३ च्या कलम १०३ अंतर्गत गणसंख्येची मोजणी करण्याच्या हेतूसाठी व्हीसी/ओएव्हीएम सुविधेद्वारे उपस्थित झालेल्या सभासदांची गणना करण्यात येईल.

एजीएमच्या सूचनेमध्ये नमूद करण्यात आलेल्या सर्व ठरावांवर आपले मतदान करण्यासाठी कंपनी आपल्या सर्व सभासदांना रिमोट ई-व्होटींग सुविधा (“रिमोट ई-व्होटींग”) प्रदान करत आहे. तसेच, कंपनी एजीएमदरम्यान ई-व्होटींग प्रणालीद्वारे मतदानाची सुविधा प्रदान करत आहे (“ई-व्होटींग”). रिमोट ई-व्होटींगच्या/ई-व्होटींगच्या प्रक्रियेचा तपशील एजीएमच्या सूचनेमध्ये नमूद करण्यात येईल.

ज्या भागधारकांना त्यांचा ईमेल पत्ता/ बँक खाते आदेश नोंदणी करायची आहे त्यांनी खालील प्रक्रियांचे पालन करावे:

| | |
|---|---|
| **डिमटेरियलाइज्ड होल्डिंग** | तुमच्या डिपॉझिटरी पार्टिसिपंटने सुचविल्या प्रक्रियेनुसार, तुमच्या डीमॅट अकाऊंटमध्ये तपशीलांची नोंदणी/अपडेट करा. |
| **फिजिकल होल्डिंग** | einward.ris@kfintech.com येथे कंपनीचे रजिस्ट्रार आणि ट्रान्सफर एजंट, केफिन टेक्नॉलॉजीज लिमिटेड यांच्याकडे निर्धारित फॉर्म ISR-1 आणि इतर संबंधित फॉर्ममधील तपशीलांची नोंदणी / अपडेट करा. सदस्य आरटीए https://ris.kfintech.com/ या वेबसाइटवरून विहित फॉर्म डाउनलोड करू शकतात. |

वरील माहिती ही कंपनीच्या एमसीए आणि सेबी च्या लागू परिपत्रकांचे पालन करून सर्व सदस्यांच्या लाभासाठी जारी करण्यात येत आहे.

**ओरॅकल फायनान्शिअल सर्व्हिसेस सॉफ्टवेअर लिमिटेड** करिता
**सही/-**
**ओंकारनाथ बॅनर्जी**
**कंपनी सेक्रेटरी आणि अनुपालन अधिकारी**

स्थळ : मुंबई
दिनांक : १४ जून, २०२३



**भारतीय रिझर्व्ह बँक**
**RESERVE BANK OF INDIA**
www.rbi.org.in

**ई-निविदा मागविण्यासाठी सूचना**

भारतीय रिझर्व्ह बँक आपल्या केंद्रीय कार्यालय इमारत, फोर्ट, मुंबई-400001 मध्ये पुढील कामे करण्यासाठी पात्र कंत्राटदारांकडून ई-निविदा प्रक्रियेने दोन-भागांमध्ये निविदा मागवित आहे.

| अनु क्र. | कामाचे नाव | कामाचा अंदाजे खर्च (₹) | इसाऱ्याची अनामत रक्कम (₹) | ई- निविदा सादर करण्याची शेवटची तारीख व वेळ |
|---|---|---|---|---|
| 1. | बँकेच्या फोर्ट, मुंबई येथील केंद्रीय कार्यालय इमारतीमध्ये एअर हॅण्डलिंग युनिट्सची रचना, पुरवठा, आस्थापन, तपासणी व कार्यान्वियन यासाठी ई-निविदा | 86 लाख | 1,72,000/- | 24 जुलै 2023 14.00 वाजेपर्यंत |

संपूर्ण तपशीलासाठी आमची वेबसाईट www.rbi.org.in अथवा एमएसटीसी पोर्टल (https://www.mstcecommerce.com/eprochome/rbi) ला भेट द्या.

**इतर सूचना/शुद्धिपत्रक/परिशिष्ट जर काही असले तर वर्तमानपत्रात प्रकाशित केले जाणार नाही, तर एमएसटीसी पोर्टल (https://www.mstcecommerce.com/eprochome/rbi) आणि बँक वेबसाईट (https://www.rbi.org.in) वर अपलोड करण्यात येईल**

कोणत्याही किंवा सर्व निविदा नाकारण्याचा अधिकार बँक राखून ठेवीत आहे.

**प्रभारी मुख्य महाप्रबंधक**
**परिसर विभाग, केंद्रीय कार्यालय**
**मुंबई**

“पैसे देण्याचे वचन देणारे इ-मेल/एसएमएस/दूरध्वनी यांना फसू नका”



**कोंकण रेल्वे कॉर्पोरेशन लिमिटेड**
(भारत सरकारचा उपक्रम)

**ई-निविदा आमंत्रण सूचना**

**कोंकण रेल्वे कॉर्पोरेशन लिमिटेड, रत्नागिरी, वेरणा आणि कुंदापुरा स्थानकांवरील रेल्वे मालवाहू सुविधेसाठी रेल्वेच्या जमिनीचा परवाना देण्यासाठी पात्र पक्षांकडून आयआरईपीएस पोर्टलवर ई-निविदेद्वारे खुली निविदा मागवित आहेत. निविदा सूचना क्रमांक: केआर/सीओ/सी/जमीन परवाना दिनांक 16.06.2023. ऑनलाइन प्रस्ताव जमा करण्याची शेवटची तारीख/वेळ : 10.07.2023 रोजी 15.00 वा. पर्यंत. मॅन्युअल प्रस्ताव स्वीकारले जाणार नाही. तपशील / सहभागासाठी कृपया संकेतस्थळ www.ireps.gov.in ला भेट द्या. शुद्धीपत्रक/ परिशिष्ट, जर असेल तर, ते फक्त याच संकेतस्थळावर प्रदर्शित करण्यात येईल.**



hgs

**हिंदुजा ग्लोबल सॉल्युशन्स लिमिटेड**
(CIN : L92199MH1995PLC084610)
**नोंदणीकृत कार्यालय** : हिंदुजा हाउस, १७१, डॉ. ॲनी बेझंट रोड, वरळी, मुंबई - ४०००१८ **दूरध्वनी क्र.** : ०२२-२४९६ ०७०७
**ई-मेल आयडी** : investor.relations@teamhgs.com । **संकेतस्थळ** : www.hgs.cx

**सूचना**
**गुंतवणूकदार शिक्षण आणि संरक्षण निधीत कंपनीच्या समभागांचे हस्तांतरण**

याद्वारे **सूचना** देण्यात येते की, कंपनी कायदा २०१३ (‘दि ॲक्ट’) चे कलम १२४ (६) नुसार, गुंतवणूकदार शिक्षण आणि संरक्षण निधी प्राधिकरण (अकाउंटिंग, ऑडिट, ट्रान्स्फर अँड रिफंड) नियम, २०१६ वेळोवेळी झालेल्या सुधारणेसह (‘दि रुल्स’) सह वाचावा. हिंदुजा ग्लोबल सॉल्युशन्स लिमिटेड, (‘दि कंपनी’) गुंतवणूकदार शिक्षण आणि संरक्षण निधी प्राधिकरणामध्ये (IEPF) सलग सात वर्षांसाठी (त्यांच्या बाकी लाभांश खात्याच्या हस्तांतरणाच्या दिनांकापासून) सभासदांचा जो लाभांश देण्यात आलेला नाही/ दावा केलेला नाही अशा समभागांचे हस्तांतरण करु इच्छित आहे. त्याचबरोबर, कंपनीद्वारे देण्यात आलेल्या आर्थिक वर्षे (FY) २०१६-१७ साठीच्या अंतरिम लाभांशाच्या संबंधित जे समभाग सलग सात वर्षांच्या कालावधीसाठी जो देण्यात न आलेला/ दावा न केलेला लाभांश (त्यांच्या बाकी लाभांश खात्याच्या हस्तांतरणाच्या दिनांकापासून) सप्टेंबर २०२३ च्या तिसऱ्या आठवड्यामध्ये IEPF कडे हस्तांतरित करण्यात येईल.

नियमांमध्ये असलेल्या तरतुदींनुसार, संबंधित भागधारकांना संबंधित पत्रव्यवहार पाठविण्यात आलेला आहे, त्यांना विनंती करण्यात येते की, आर्थिक वर्ष २०१६-१७ साठी देण्यात न आलेला/ दावा न केलेल्या या अंतरिम लाभांशाचा दावा करावा, जर **३१ ऑगस्ट २०२३ रोजी किंवा त्यापूर्वी** संबंधित सभासदांकडून वरील लाभांशाच्या रोखीकरणासाठी कोणताही प्रतिसाद कंपनीकडे प्राप्त झाला नाही तर कंपनी नियमांनुसार सप्टेंबर २०२३ च्या तिसऱ्या आठवड्यात संबंधित समभाग IEPF कडे हस्तांतरित करील.

कंपनीने त्यांचे संकेतस्थळ www.hgs.cx येथे ‘इन्व्हेस्टर्स टॅब’ अंतर्गत अशा भागधारकांचे तपशील अपलोड केलेले आहेत ज्यांचे भाग IEPF कडे हस्तांतरीत करण्यास योग्य आहेत. देण्यात न आलेल्या लाभांशाच्या तपशिलाची आणि IEPF प्राधिकरणाच्या डिमॅट खात्याच्या हस्तांतरणासाठी समभाग योग्य आहेत याची पडताळणी सभासदांनी करावी.

संबंधित सभासदांनी नोंद घ्यावी की, IEPF कडे भाग हस्तांतरित करण्याच्या हेतूसाठी कंपनीद्वारे नक्कल भागप्रमाणपत्र जारी करण्यासाठी पुरेशी सूचना दिली असल्याचे मानण्यात येईल याचा तपशील कंपनीच्या संकेतस्थळावर उपलब्ध आहे. संबंधित सभासदांनी नोंद घ्यावी की, IEPF कडे अशा समभागांचे हस्तांतरण केल्यानंतर, बाकी/ दावा न केलेल्या लाभांशांच्या रकमेबाबतीत कंपनीविरुद्ध कोणताही दावा करता येणार नाही आणि IEPF कडे कंपनीद्वारे समभागांचे हस्तांरण करण्यात येईल. तथापि, कायदा आणि नियमांच्या तरतुदीनुसार संबंधित सभासद हस्तांतरित भागांचा दावा बाकी/ दावा न केलेली लाभांश रक्कम IEPF प्राधिकरणाकडे करू शकतो. ज्याचा तपशील www.iepf.gov.in वर उपलब्ध आहे.

याबाबतच्या शंकासमाधानासाठी/मदतीसाठी संबंधित सभासदांनी कंपनीचे निबंधक आणि हस्तांतरण प्रतिनिधी म्हणजेच कफिन टेक्नॉलॉजिज लिमिटेड येथे १८०० ३०९ ४००१ किंवा einward.ris@kfintech.com किंवा कंपनी investor.relations@teamhgs.com येथे संपर्क साधावा.

**हिंदुजा ग्लोबल सॉल्युशन्स लिमिटेडकरिता,**
**सही/-**
**नरेंद्र सिंग**
**कंपनी सचिव**
**FCS:4853**

ठिकाण : मुंबई
दिनांक : १५ जून २०२३



**नांदेड वाघाळा शहर महानगरपालिका, नांदेड**
(कर विभाग)

जावक क्र. कर विभाग/३१३७/२०२३ | दिनांक - १४ जून २०२३

**ई-निविदा सूचना (दुसऱ्यांदा)**

**विषय : नांदेड वाघाळा शहर महानगरपालिकाकरिता महानगरपालिका हद्दीतील सर्व मालमत्तांचे (जमिनी व इमारती) सर्वेक्षण करून आवश्यक माहिती संकलित करणे, संगणीकृत कर मुल्यांकन व संबंधित विभागातील कामकाजाचे संगणकीकरणाकरिता विविध संगणक आज्ञावली विकसित करून पुरविणे आवश्यक तांत्रिक सेवा, तांत्रिक पुरवठा व इतर अनुषंगिक कामे करणेबाबत.**

नांदेड वाघाळा शहर महानगरपालिका, नांदेड यांच्या वतीने नोंदणीकृत व अनुभवी कंत्राटदारांकडून वरील कामाकरिता गुणवत्ता निकषाद्वारे ई-निविदा प्रणालीद्वारे (ऑनलाईन) निविदा मागविण्यात येत आहेत. करिता इच्छुक निविदाधारकांनी आपली ई-निविदा https://mahatenders.gov.in स्थळावर ऑनलाईन पद्धतीने निविदा फी व अनामत रक्कम ऑनलाईन नेटबँकींग सुविधेद्वारे भरणा करून संपूर्ण पात्रता दस्ताऐवजांसह विहीत मुदतीत सादर करावी. निविदेसंदर्भात संपूर्ण कामाचे सविस्तर विवरण, निविदा पुस्तक अटी व शर्ती तसेच नोंदणी व पात्रता निकष ऑनलाईन निविदा संचिकेत उपलब्ध करण्यात येत आहेत.

| अ.क्र. | तपशिल | सुरू दिनांक | वेळ | समाप्त दिनांक | वेळ |
|---|---|---|---|---|---|
| १ | निविदा प्रसिद्धी | दि. १५.०६.२०२३ | दु. ०२.०० | दि. २३.०६.२०२३ | सायं. ५.०० |
| २ | कागदपत्र डाऊनलोड करणे | दि. १५.०६.२०२३ | दु. ०२.०० | दि. २३.०६.२०२३ | सायं. ५.०० |
| ३ | निविदा ऑनलाईन भरणेचा कालावधी | दि. १५.०६.२०२३ | दु. ०२.०० | दि. २३.०६.२०२३ | सायं. ५.०० |
| ४ | ऑनलाईन निविदा उघडणेचा कालावधी | दि. २६.०६.२०२३ | दुपारी २.०० किंवा प्रशासकीय सोयीनुसार | | |

**टीप** : कोणतेही कारण न देता एक अथवा सर्व निविदा स्वीकारण्याचा अथवा नाकारण्याचा अधिकार मा. आयुक्त, नांदेड वाघाळा शहर महानगरपालिका यांनी राखून ठेवलेला आहे.

स्वाक्षरित
**अति. आयुक्त**
**नांदेड वाघाळा शहर महानगरपालिका, नांदेड**



**जिल्हा सहकारी निवडणूक अधिकारी तथा जिल्हा उपनिबंधक, सहकारी संस्था, कोल्हापूर यांचे कार्यालय २०४ /ख/ई /न्यू शाहूपुरी, भूविकास बँक इमारत, ३ रा मजला, कोल्हापूर**

**महाराष्ट्र सहकारी संस्था (समितीची निवडणूक) नियम २०१४ नियम १८ नुसार ब वर्गात मोडणाऱ्या सहकारी संस्थांचा निवडणूक कार्यक्रम**

| अ. क्र. | तालुका | संस्थेचे नाव | निवडणूक निर्णय अधिकारी यांचे नाव व पदनाम | निवडणूक निर्णय अधिकारी यांचे कार्यालय | नामनिर्देशन पत्र मिळण्याचा व दाखल करण्याचा दिनांक व वेळ | नामनिर्देशन पत्र छाननी दिनांक व वेळ | विधीग्राह्य नामनिर्देशन पत्रांची यादी प्रसिद्धीचा दिनांक | उमेदवाराने नामनिर्देशन पत्र मागे घेण्याचा दिनांक | उमेदवारांना निशाणीचे वाटप व अंतिम यादी प्रसिद्धीचा दिनांक | मतदान व मतमोजणी दिनांक |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| १ | कोल्हापूर शहर | श्री महालक्ष्मी को-ऑप बँक लिमीटेड कोल्हापूर | श्री. निलकंठ करे, जिल्हा उपनिबंधक, सह. संस्था, कोल्हापूर | जिल्हा उप निबंधक, सहकारी संस्था, कोल्हापूर | दि. १६/०६/२०२३ ते २२/०६/२०२३ स. ११.०० ते दु. ३.०० वाजेपर्यंत | दि. २३/०६/२०२३ दु. १२.०० वा. | दि. २७/०६/२०२३ स. ११.०० वा. | दि. २७/०६/२०२३ ते ११/०७/२०२३ स. ११.०० ते दु. ३.०० वाजेपर्यंत | दि. १२/०७/२०२३ स. ११.०० वा. | मतदान दि. २३/०७/२०२३ स. ८.०० ते सायं. ५.०० व मतमोजणी दि. २४/०७/२०२३ रोजी स. ८.०० वाजलेपासून संपेपर्यंत सतत |

१) सविस्तर निवडणूक कार्यक्रम बँक/ संस्था सर्व शाखांचे नोटीस बोर्ड व निवडणूक निर्णय अधिकारी यांचे कार्यालयात प्रसिद्ध केला आहे.
२) प्राप्त नामनिर्देशन पत्रांची यादी रोज सायं ४.०० वाजता निवडणूक कार्यालयात प्रसिद्ध केली जाईल. ३) निवडणूक कार्यक्रम मतदान व मतमोजणीचे दिनांक वगळून शासकीय/सार्वजनिक सुट्ट्या खेरीज सुरु राहील. ४) मतदान व मोजणी स्थळ निवडणूक निर्णय अधिकारी नंतर घोषीत करतील.

(शिक्का)

सही/-
(निलकंठ करे)
जिल्हा सहकारी निवडणूक अधिकारी तथा जिल्हा उपनिबंधक, सहकारी संस्था, कोल्हापूर